# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४३३/२०२३ दिनांक – १९/१२/२०२३

## घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुन एकुण रु. ६,०१,१९९/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटिकरण पथकाला यश

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १३/१२/२०२३ रोजी रात्री ०९.०० वा. ते दिनांक १४/१२/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. चे दरम्यान लिओनिक्स लाईटींग सोल्युशन एलईडी लाईट मॅन्युफॅक्चरींग कंपनी, सागर प्लाझा इंडस्ट्रीयल इस्टेट, सातीवली रोड, वसई पुर्व, जि. पालघर या बंद कंपनीचे तीन अनोळखी इसमांनी कुलुप तोडुन कंपनीत प्रवेश करुन कंपनीतील रु. १,९८,५०५/- किंमतीच्या एल.ई.डी. लाईट व इतर सामान असा माल घरफोडी चोरी करुन नेलेबाबत यातील फिर्यादी यांनी तक्रार दिले वरुन गु.र.क्र. ९१८/२०२३ कलम ४५४,४५७,३८०,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयाचा तपास करुन ४ इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता आरोपी नामे १) विरेंद्र राधेश्याम सोनी, वय २७ वर्ष, रा. भोयदापाडा, वाघराळपाडा, वसई पुर्व, जि. पालघर याने माल चोरी करुन सदर माल आरोपी नामे २) मफीजुल शमशुददीन शेख, वय ४१ वर्ष, रा. संगमनगर झोपडपटटी, वडाळा, मुंबई ३७ ३) भैरवलाल नथुलाल पटेल, वय २३ वर्ष, रा. भोयदापाडा, वसई पुर्व, जि. पालघर ४) सनाऊल्ला कलाम शेख, वय ३३ वर्षे, धंदा- भंगार विक्री, रा. राजकोट वाला बिल्डिंग नं. २१, शॉप नं. ०२, न्यु काशि रोड, नळ बाजार, मांडवी, मुंबई यांना विक्री केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले. तसेच यापुर्वी देखील सदर कंपनीतील मालाची चोरी केल्याची तपासात निष्पन्न झाले असुन वर दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले व यापुर्वी देखील चोरी केलेले एल.ई.डी. लाईट व एल.ई.डी. लाईट बनविण्यासाठी लागणारे साहीत्य असा रु. ६,०१,१९९/- किंमतीचा मुद्देमाल व रु. ७,००,०००/- किंमतीची गुन्हा करतेवळी वापरलेली हयुडांई एक्सेन्ट कार असा एकुण रु. १३,०१,१९९/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे गुन्हयात चोरी गेलेला संपुर्ण माल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.